# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-26.05.2026** **वार- मंगळवार**

---

**<u>सावंतवाडी रेल्वेस्थानक-नामकरण</u>**

कोकण रेल्वेचे शिल्पकार, माजी रेल्वेमंत्री, केंद्रीय अर्थमंत्री, ज्येष्ठ नेते स्व. मधु दंडवते यांचे नाव सावंतवाडी रेल्वे स्थानकास देण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. केंद्राच्या मान्यतेनंतर, सावंतवाडी रेल्वे स्थानकाचे नाव 'लोकमान्य मधु दंडवते रेल्वे टर्मिनस' असे होणार आहे.

**<u>मसाप-वर्धापनदिन</u>**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या 121व्या वर्धापन दिनानिमित्त आज पुण्यात बालगंधर्व रंगमंदिरात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे. यंदाचा मसाप जीवनगौरव पुरस्कार प्रसिद्ध लेखिका प्रतिभा रानडे यांना, ज्येष्ठ संगीतकार, गायक पंडित सत्यशील देशपांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला, लेखक, दिग्दर्शक, अभिनेते हृषिकेश जोशी, माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांची उपस्थिती आहे.

**<u>पिंपरी-चिंचवड-काटकसर</u>**

पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या ऊर्जा बचत, इंधन वापर नियंत्रण आणि खर्च कपातीच्या निर्देशांनुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सर्व विभागांना काटकसरीचं धोरण प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे, अभ्यास, प्रशिक्षण किंवा शासकीय कामकाजासाठीचे परदेश दौरे पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आले आहेत. तसंच नव्याने परदेश दौरे नियोजित न करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. महापालिकेच्या कामकाजासाठी, उपलब्ध वाहनांमध्ये शक्य त्या प्रमाणात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करावा, कर्मचाऱ्यांनी संयुक्त दौऱ्यांदरम्यान कारपूलिंगचा अवलंब करावा, तसेच मेट्रो, रेल्वे, पीएमपीएमएल बस यांसारख्या सार्वजनिक वाहतूक सुविधांचा अधिकाधिक वापर करावा, असेही नमूद करण्यात आले आहे. बैठका, प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्रे आणि आढावा बैठका शक्यतो दूरस्थ पद्धतीने आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**<u>'स्वागतम ई-प्रवेश'</u>**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नागरिकांसाठी सुरू केलेल्या 'स्वागतम ई-प्रवेश' या ऑनलाइन नोंदणी प्रणालीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेशासाठी १ मे २०२६ पासून ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना कमी वेळेत, सुरक्षित आणि सुलभ पद्धतीने महापालिकेच्या मुख्य इमारतीत प्रवेश मिळत असून प्रत्येक प्रवेशाची अचूक नोंदही ठेवली जात आहे. नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेची बचत करणारी सेवा देण्याच्या उद्देशाने महापालिकेने हा डिजिटल उपक्रम सुरू करण्यात आला आहे. काल संध्याकाळपर्यंत सुमारे, ७ हजार ८९४ नागरिकांनी या प्रणालीचा लाभ घेतला आहे.

**<u>पिंपरी-चिंचवड-पावसाळी कामं</u>**

संभाव्य पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर, पिंपरी-चिंचवड शहरातील नालेसफाईची कामं युद्धपातळीवर पूर्ण करून नाल्यांवरील अतिक्रमणं तात्काळ हटवावीत, तसेच नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी, असे निर्देश पिंपरी-चिंचवड

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले. पिंपरीत आज, या संदर्भात झालेल्या, विविध विभागांच्या कामकाजाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. शहरातील प्रमुख रस्ते, दुभाजक आणि चौक, स्वच्छ आणि आकर्षक ठेवण्यावर भर देत आयुक्तांनी सुशोभीकरणासाठी संस्था आणि कंपन्यांचं सहकार्य घेण्याच्या सूचनाही दिल्या.

**पीएच.डी. शैक्षणिक पात्रता**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच संलग्न महाविद्यालयांमधील पीएच.डी.ला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची ऑनलाइन शैक्षणिक पात्रता आता वर्षभरात कधीही पूर्ण करता येणार आहे. यासाठीची ऑनलाइन लिंक संपूर्ण वर्षभर सुरू ठेवण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे.

**भाजपा-शिबिर**

पुणे शहरातील भाजप लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांसाठी, नुकतंच, दोन दिवसीय 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण शिबिर'आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचं उद्घाटन राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झालं. शिबिरात विविध विषयांवरील पाच सत्रांचं आयोजन करण्यात आलं होतं. भाजपमध्ये इतर पक्षांतून आलेल्या नगरसेवकांना तसंच विद्यमान पदाढीकऱ्यांना, भाजपच्या विचारधारेची आणि संघर्षाची ओळख आणि उजळणी व्हावी, या उद्देशाने या शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं.

**प्रकाशकसंघ-पुरस्कार**

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे दिला जाणारा जीवनगौरव आणि साहित्यसेवा कृतज्ञता पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी. ३० मे रोजी, मराठा चेंबर ऑफ कॉमर्समध्ये आयोजित करण्यात आला आहे. अनिल बुक एजन्सीचे संचालक अनिल टांकसाळे यांना 'जीवनगौरव पुरस्कारा'ने, तर, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. न. म. जोशी यांना 'साहित्यसेवा पुरस्कारा'ने गौरविलं जाणार आहे. या कार्यक्रमात, ज्येष्ठ लेखिका डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी आणि ज्येष्ठ मुद्रितशोधक विजय सरदेशपांडे यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. इतिहासतज्ज्ञ डॉ. राजा दीक्षित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील.

**हवामान**

पुण्यात आज दिवसभर आकाश मुख्यतः निरभ्र होतं, संध्याकाळी ते अंशतः ढगाळ झालं. आज कमाल 37 आणि किमान 24 पूर्णांक 30 अंश सेल्सियस तापमानची नोंद करण्यात आली. उद्याही अशाच प्रकारचं हवामान राहणार असून, संध्याकाळी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**